<u>नि.दि.दावा क्र.१७१/२०१५ मधील नि.१२० वरील आदेश</u>

श्री. चंद्रकांत बाबुराव पाटील व १ ... वादी

वि.

श्री. आसिफ इकबाल धनानी व ४ ... प्रतिवादी

........

प्रतिवादींनी सदरचा अर्ज हा सदर खटला या न्यायालयातून वर्ग करुन मागण्याकरीता मा. जिल्हा न्यायालयामध्ये सादर केला असल्यामुळे सदर दाव्याचे कामकाज तहकुब करण्याकरीता दिलेला आहे.

२. वादीचे वकील श्री. पाल यांनी सदर अर्जाला हरकत घेतली. त्यांचा युक्तीवाद असा की, प्रतिवादी हे जाणीवपूर्वक प्रकरण लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांना या न्यायालयाने या पूर्वीच ट्रान्सफर पिटीशन दाखल करण्याकरीता दोन महिन्यांचा अवधी दिला होता. त्यानंतर सुद्धा त्यांनी ट्रान्सफर पिटीशन दाखल केला नाही. त्यांचा पुढे युक्तीवाद असा की, वादी हा जेष्ठ नागरीक आहे व तो न्यायालयात प्रत्येक तारखेला हजर असतो. त्यांचा पुढे असा युक्तीवाद असा की, सदर अर्ज हा स्वच्छ हेतुने केलेला नाही व सदर दाव्याकरीता स्थगीती मा. जिल्हा न्यायालयाने दिलेला नाही. त्यांचा पुढे युक्तीवाद असा की, प्रतिवादींनी सदर खटल्याचा स्थगीती आदेश सादर केलेला नाही किंवा ट्रान्सफर पिटीशनची प्रतही दाखल केलेली नाही. तरी सदरचा अर्ज रद्द करण्याची मागणी केली.

३. प्रस्तुत खटल्यामध्ये दिनांक २५/०७/२०१६ रोजी पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले होते. त्यानंतर वेगवेगळया कारणास्तव प्रतिवादींनी उलटतपास घेण्याचे टाळलेले असल्याचे मागील अभिलेखावरुन निष्पन्न होते. हे खरे आहे की, ट्रान्सफर पिटीशन दाखल करण्याकरीता यापूर्वीच प्रतिवादीला दोन महिन्यांचा अवधी देवून प्रकरण तहकुब केले होते. परंतु सदर मुदतीमध्ये प्रतिवादींनी ट्रान्सफर पिटीशन दाखल केले या बद्दलची माहिती कोर्टाला दिलेली नाही. सदर प्रतिवादी वादीचा खटला लांबणीवर टाकत असल्याचे रोजनाम्यावरुन निष्पन्न होते. परंतु आज प्रतिवादींनी किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५६/२०१७ हा मा. जिल्हा

न्यायालयांत दाखल झाल्याने नमुद केले आहे. सबब न्यायाच्या हेतुने प्रतिवादींना पुरेशी संधी मिळण्याकरीता खालील आदेश पारित करतो.

<u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी पुढील तारखेपर्यंत सदर खटल्याचा स्थगीती आदेश सादर करावा अन्यथा दाव्याचे कामकाज स्थगीत ठेवले जाणार नाही.

स्वाक्षरी/—

पालघर (दि. उ. डोंगरे)

दिनांक : १०/०१/२०१७ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पालघर.